<u>नियमित दिवाणी दावा क्र. ८/२०१९</u>

<u>निशाणी क्र. १९</u>

<u>वादीतर्फे साक्षीदाराचा विधीज्ञ श्री.एस. यु. संदे यांचेतर्फे पुढील सरतपास शपथेवर सुरु</u>

माझे सरतपासणीचे शपथपत्रामधील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे टंकलिखित केला असून तो मला वाचून दाखविला. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे.

आता मला नि.क्र.१५/१ वर दाखल माझे नावे बँकेतर्फे दिलेले अधिकारपत्राची सत्यप्रत दाखविली, त्यावर बॅकेचा शिक्का असून त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे, (त्यास **<u>निशाणी २०</u>** देण्यात येते). आता मला नि.क्र. १७/१ वर दाखल प्रतिवादीचा दिनांक ०३/०३/२०१३ रोजीचा मुळ कर्ज मागणी अर्ज दाखविला, त्यावर प्रतिवादीचा निशाणी अंगठा असून त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे, (त्यास **<u>निशाणी २१</u>** देण्यात येते). आता मला नि.क्र.१७/२ वर दाखल दिनांक १४/०३/२०१३ रोजीचे प्रतिवादीचे बारोअर्स/गॅरेन्टर्स प्रोफाईलची मुळ प्रत दाखविली, त्यावर प्रतिवादीचा निशाणी अंगठा असून त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे, (त्यास **<u>निशाणी २२</u>** देण्यात येते ). आता मला नि.क्र.१७/३ वर दाखल प्रतिवादीला दिलेल्या कर्ज मंजूरीचे मुळ पत्र दाखविण्यात आले, त्यावर त्यावेळेचे बँकेच्या अधिका–याची सही व शिक्का असून त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे (त्यास **<u>निशाणी २३</u>** देण्यात येते). आता मला नि.क्र.१७/४ ते नि.क्र.१७/६ वर दाखल मुळ ॲथारिटी लेटरच्या तीन प्रती दाखविण्यात आल्या, त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे (त्यास **<u>निशाणी २४ ते २६</u>** देण्यात येते). आता मला नि.क्र.१७/७ ते नि.क्र.१७/९ वर दाखल मुळ मागणी वचनपत्राच्या तीन प्रती (डिमांड प्रॉमिसरी नोट) दाखविण्यात आल्या, त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे (त्यास **<u>निशाणी २७ ते २९</u>** देण्यात येते). आता मला नि.क्र.१७/१० वर दाखल प्रतिवादीचे मुळ ड्राफ्ट डिक्लेरेशन दाखविण्यात आले, त्यावर प्रतिवादीचा निशाणी अंगठा असून त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे (त्यास **<u>निशाणी ३०</u>** देण्यात येते). आता मला नि.क्र.१७/११ वर दाखल

मुळ संयुक्त करार (कम्पोझीट ॲग्रीमेंट) दाखविण्यात आला, त्यावर प्रतिवादीचा निशाणी अंगठा असून त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे (त्यास **<u>निशाणी ३१</u>** देण्यात येते). आता मला नि.क्र.१७/१२ वर दाखल मुळ दृष्टीबंधन सह ऋण करार (हायपोथिकेशन ऑफ लोन ॲग्रीमेंट) दाखविण्यात आला, त्यावर प्रतिवादीचा निशाणी अंगठा असून त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे (त्यास **<u>निशाणी ३२</u>** देण्यात येते). आता मला नि.क्र.१७/१३ ते नि.क्र.१७/१५ वर दाखल कर्जाच्या तीन पावत्या मुळ प्रती दाखविल्या, त्यावर प्रतिवादीचा निशाणी अंगठा व तत्कालीन शाखा व्यवस्थापकाच्या सह्या असून त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे (त्यास **<u>निशाणी ३३ ते ३५</u>** देण्यात येते).

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>प्रतिवादीविरुध्द सदरचा दावा एकतर्फा चालविण्यात आल्यामुळे उलटतपास नाही.</u>**

समक्ष/श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Date: 2025.08.26 13:58:04 +0530

**इस्लामपूर.** **(भगवान म. कारलेकर)**

**दिनांक – २२/०८/२०२५** **सह. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, इस्लामपूर**